Historicity Research Journal
Volume 1 | Issue 1 | Sept 2014 ISSN:- 2393-8900

**Research Article**

# सातारा परिसरातील दुर्लक्षित धार्मिक पर्यटन स्थळे

**प्रा.बोडखे संजीव सुखलाल**
इतिहास विभाग , शरदचंद्र पवार महाविद्यालय लोणंद,
ता.खंडाळा जि.सातारा.

## प्रस्तावना

मराठी साम्राज्याची राजधानी असलेले एकेकाळचे सातारा हे आजही आपल्या अनेक आठवणी, व खुणा जवळ राखून आहे. सातारा शहर व परिसरात अनेक ऐतिहासिक व धार्मिक पर्यटन स्थळे आहेत. यातील काही स्थळे प्राचीन व मध्ययुगीन काळात निर्माण झालेली आहेत्. तर काही स्थळे आधुनिक काळातील आहेत. धार्मिक पर्यटन स्थळामध्ये काही स्थळे ही प्रसिद्ध आहेत तर काही शासन पर्यटकांनी दुर्लक्षित केलेली आहेत. तेव्हा या शोधनिंबधामध्ये सातारा परिसरातील अनेक धार्मिक पर्यटन स्थळापैकी काही निवडक धार्मिक स्थळांची माहिती नमूद केलेली आहे. त्यामध्ये सातारच्या खिंडीतील कुरणेश्वर गणपती मंदिर, यवतेश्वरचे शिवमंदिर, नटराज मंदिर, माहुलीची महादेव मंदिरे, धावडशीचे ब्रह्मेंद्रस्वामी मंदिर, पाटेश्वर शिवमंदिर, मेरूलिंग मंदिर इ.दुर्लक्षित धार्मिक पर्यटन स्थळांचा समावेश होतो. त्यांची सविस्तर माहिती पुढील प्रमाणे आहे.

## 1. सातारच्या खिंडीतील कुरणेश्वर गणपती मंदिर

सातारा शहरातुन अंजिक्यतारा व यवतेश्वर डोंगर यांच्यामधून कुरणेश्वरला जाताना एक बोगदा लागतो. हा बोगदा सन 1855 मध्ये कॅ.पी.हिल यांच्या मार्गदर्शनाखाली बांधला गेला आहे. या बोगदयातून बाहेर गेल्यानंतर डाव्या बाजुला कुरणेश्वर गणपतीचे मंदिर आहे. या मंदिरास खिंडीतील गणपती असेही म्हणतात. हे मंदिर पहिले बाजीराव पेशवे यांचे मेहुणे चासकर यांनी सन 1723 मध्ये बांधले आहे. आजच्या युगात हे मंदिर निश्चितच मानसिक समाधान व शांती मिळवून देते. या मंदिरात भाद्रपद शुद्ध चतुर्थी व माघ शुद्ध चतुर्थीच्या वेळी पाच दिवस उत्सव साजरा केला जातो.[1]

## 2. यवतेश्वरचे शिवमंदिर

सातारा शहराच्या नैत्रत्येस पाच किमी अंतरावर कास—बामणोली या घाटाच्या रस्त्यावर हे शिवमंदिर आहे. या मंदिराची समुद्रसपाटीपासूची उंची 1230 मी. आहे. हे मंदिर छत्रपती शाहू महाराजांच्या कारकिर्दीत बांधलेले आहे. मंदिराच्या व्यवस्थेकरिता या गावात महसुल नेमुन दिला आहे. मंदिराच्या पश्चिमेस पिण्याच्या पाण्याचे तळे असून त्यास देवाचे तळे म्हणतात. मंदिराच्या सभोवती धर्मशाळा असून दक्षिणेस रामेश्वराचे व मारूतीचे, उत्तरेस काळभैरवाचे व घाटाईदेवीचे आणि समोर गणपती मंदिर आहे. मंदिराच्या आवारात. दिपस्तंभ आहे. या मंदिराचे बांधकाम हेमाडपंथी शैलीतील आहे. मंदिराचे एकुण तीन भाग दगडामध्ये बांधलेले असून स्तंभावर उत्कृष्ट कोरीव काम आहे. येथे कार्तिक शुद्ध प्रतिपदेला यात्रा भरते. तसेच श्रावणी सोमवारी भाविक दर्शनासाठी येतात. महाशिवरात्रीला येथे मोठा उत्सव भरतो.[2]

## 3. नटराज मंदिर

हे मंदिर सातारा शहारात सातारा—पंढरपुर रस्त्यावर आहे. हे मंदिर शामराव डी.शानभाग तथा शामण्णा यांनी दिलेल्या देणगीतून साकारले आहे. या मंदिराच्या बांधकामाची सुरूवात सन 1981 पासून सुरू होऊन जून 1985 मध्ये पूर्ण झाले. मंदिराभोवती आतील परिक्रमा 167 मी लांब व 164 मी. रूंद ग्रॅनाईट दगडात असून आतील भाग फरसबंद आहे. मंदिरास चार दिशांना दक्षिण भारतीय वास्तुशैलीचे 20 मी. उंचीचे गोपुरे आहे. मुख्य गोपुर पश्चिमेकडील असून त्यास महाराष्ट्र प्रवेशद्वार, उत्तरेकडील गोपुरास आंध्रप्रदेश प्रवेशद्वार, पुर्वेकडील गोपुरास कर्नाटक प्रवेशद्वार व दक्षिणेकडील गोपुरास तामिळनाडु प्रवेशद्वार असे म्हणतात. प्रत्येक गोपुर पाच मजली असुन त्याला तांब्याचे नऊ कळस आहेत. प्रवेशद्वाराची उंची प्रत्येकी 7.5 मी. असुन ती सागवानी

लाकडाची आहेत. या सर्व प्रवेशद्वाराचा तसेच मुख्य नटराज मंदिराचे प्रवेशद्वार, गाभारा, जाळी व ध्वजस्तंभ यांचा खर्च केरळ शासनाने केलेला आहे. या मंदिराच्या आवारात मूलनाथेश्वर मंदिर, शंकराचार्याचे छोटे मंदिर, उमादेवीचे मंदिर व चंडीकेश्वर मंदिर इ. मंदिरे आहेत तर श्रीनटराज, शिवकामसुंदरी, पंतजली, व्याघ्रपाद, काळभैरव आणि माणिकवाचक यांच्या मूर्ती आहेत.

नटराज मंदिराच्या गर्भगृहात नटराजाची मूर्ती 1. 37 मी. उंचीची आहे. ही पंचधातूची मूर्ती महाबलीपुरमचा मुर्तिकार भुपती स्थपती याने बसविली आहे. या मुर्तीच्या चेहऱ्यावर हास्य असल्याने तिला आनंदनरेश असेही म्हणतात. शिवकामसुंदरी मूर्ती 76 सेंमी असुन या दोन्ही मुर्ती धातुशिल्पाचा उत्तम नमुना आहेत. नटराज उजव्या बाजूर असलेल्या जागेस चिदंबर रहस्य म्हणतात. येथे पडद्यात सोन्याची बिल्वदलमाला आहे. या बिल्वदमालेने नटराजाची रहस्यपुजा केली जाते. या मंदिराभोवती गणपती, नवग्रह, राधाकृष्ण व इतर देवांची मंदिरे आहेत. या नटराजास वर्षातुन सहा वेळा महाभिषेक घालतात. मंदिरात गणेश जयंती नवरात्र शिवजंयती उत्सव मोठया प्रमाणात साजरे केले जातात.[3]

### 4. माहुलीतील महादेव मंदिरे

सातारा शहराजवळ पाच किमी अंतरावर संगम माहुली हे गाव आहे. या ठिकाणी कृष्णा व वेण्णा नद्यांच्या संगमावर असल्याने यास संगम माहुली असे म्हणतात. संगम माहुलीची स्थापना पंत प्रतिनिधीनी सन 1719 च्या सुमारास केली. शाहु महाराजांनी श्रीपतराव प्रतिनिधीचे संकल्प सांगितल्याबद्दल अर्धा चाहुर जमीन दान दिली होती. या जागेत प्रतिनिधीनी वस्ती केली. तेव्हापासुन येथे कृष्णा–वेण्णीचा उत्सव प्रतिवर्षी माघ महिन्यात साजरा केला जातो.[4]

अ) **संगमेश्वर महादेव मंदिर**

हे मंदिर कृष्णा व वेण्णा नदीच्या संगमावर आहे. या मंदिराचे बांधकाम इ.स. 1742 मध्ये श्रीपतराव पंतप्रतिनिधीनी केले. कृष्णा नदीच्या काठापासुन मंदिराच्या प्रांगणापर्यंत घाटाच्या पायऱ्या आहेत. या मंदिरात प्रवेश केल्यानंतर प्रथम चौकोनी प्रांगण व मोकळा व्हरांडा लागतो. या व्हरांडयात लक्ष्मीची प्रतिमा चितारलेली आहे. यानंतर देवडी व गाभारा लागतो. गाभाऱ्यात महादेवाची पिंड आहे. मंदिरासमोर नंदी असून त्यावर मेघडंबरी आहे. नंदीच्या चौथऱ्यावर व घुमटाच्या वरच्या भागावर फुलपाखरांच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत. मंदिराच्या जवळच त्रिकोणी जागेत बनशापुरी साधुची व त्याच्या शिष्यांची समाधी आहे.[5]

ब) **विश्वेश्वर महादेव मंदिर**

हे मंदिर कृष्णा व वेण्णा नदीच्या संगमावर आहे. या मंदिराचे बांधकाम इ.स. 1742 मध्ये श्रीपतरावर पंतप्रतिनिधीनी केले. हे मंदिर यादव शैलीचे अनुकरण करून उभारण्यात आले आहे. हे मंदिर अर्धा मीटर उंचीच्या अधिष्ठानावर असुन तारकाकृती विधानाचे आहे. याची सभागृह, अंतराळ व सभामंडप अशी रचना आहे. गर्भगृहात शिवपिंड आहे. अंतराळ चार स्तंभावर उभारलेले असुन त्यापैकी दोन अर्ध स्तंभ व दोन पूर्णस्तंभ आहेत. सभामंडप तिन्ही बाजूने मोकळा असून त्यास मुखमंडप आहे. सभामंडपाचे खांब पायाला चौकोनी तर मध्यभागावर दंडगोलाकृती आहेत. खांबाच्या वरील भागावर पुष्पवेली कोरलेल्या आहेत. मुख मंडपाच्यावर तिन्ही बाजुस विटाचुन्यात मेघडंबरी उभारलेली आहे. सभामंडपातील घंटा असुन यावर अष्टकोनीय शिखर आहे. मुख्य मंदिराच्या शिखरावर देवकोष्ठे असुन त्यामध्ये पौराणिक कथानक कोरले आहे. दोन देवकोष्ठामधील भागात माहूतासह हत्तीच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत. मंदिराच्या उत्तर व पश्चिम बाजुला ओवऱ्या आहेत.[6]

### 5. धावडशीचे ब्रहमेंद्रस्वामी मंदिर

सातारा शहराच्या वायव्येस 9 किमी अंतरावर धावडशी हे गाव आहे. हे गाव ब्रम्हेंद्रस्वामींना सन 1728 मध्ये छत्रपती शाहुकडुन इनाम मिळाले होते. ब्रम्हेंद्रस्वामी छत्रपती शाहु महाराजांचे राजगुरू व पेशवव्याचे गुरू होते. स्वामी मुळचे जालना जिल्हयातील दुधड गावचे होते. वेदशास्त्राचे अध्ययन संपल्यानंतर ते भ्रमण करीत कोकणातील परशुराम क्षेत्री आले. तेथे त्यांनी आश्रम स्थापन केला. सन 1728 मध्ये छत्रपती शाहु महाराजांच्या आग्रहाने ते धावडशीला येवून कायम स्थानिक झाले. ब्रम्हेंद्रस्वामीनी खूप सामाजिक, राजकीय व धार्मिक कार्य केले. येथे भार्गवरामाचे मुख्य मंदिर आहे. सन 1745 ब्रम्हेंद्रस्वामी निवर्तल्यानंतर छत्रपती शाहुमहाराजांनी धावडशीस त्यांच्या समाधीवर भार्गवराम मंदिर बांधले. या मंदिरास तीन प्रशस्त गाभारे आहेत व पुढे सभामंडप

आहे. मुख्य गाभाऱ्यात भार्गवरामाची काळया पाषाणाची रेखीव मूर्ती आहे. तिच्या दोन्ही बाजुस काळा व काम या परशुरामाच्या दोन भावाच्या छोटया मूर्ती आहेत. या मूर्ती पितळेच्या असुन 91 से.मी. ते 1.7 मी. उंचीच्या आहेत. समाधीच्या गाभारा प्रशस्त असुन त्याच्या प्रवेशद्वारावर उत्तम शिल्पाकृती आहेत. मंदिराच्या महाद्वाराच्या शिरोभागी मराठी शिलालेख आहे.[8] मुख्य गाभाऱ्यात मध्यभागी मोठी रंगशिला आहे. गाभारा प्रशस्त व दगडी फरशीचा आहे. त्यात उजव्या बाजुला अष्टभुजा देवाची मुर्ती असून सर्व बाजूनी दशावतार कोरलेले आहेत. तर शिखरावर ठिकठिकाणी नक्षीकाम कोरलेले आहे. शिखराच्या पुढील भागात चौकोनी मनोरे आहेत. मंदिरापुढील सभामंडपात सुमारे 100 वर्षापुर्वी बांधकामावर कलाकुसरीचे लाकडी स्तंभ व तुळया जोडण्यात आल्या आहेत. मंडपाच्या चोहोबाजूनी दगडी भुयार असून त्यांत शिवलिंग व नंदी आहे. जलकुंडातुन पडणाऱ्या शिवलिंगास स्नान घडते. येथे श्रवण शुद्ध प्रतिपदा ते नवमीपर्यंत स्वामीच्या पुण्यतिथीचा उत्सव असतो. तसेच अक्षय त्रतियेस परशुराम जयंती उत्सव तीन दिवस असतो.[9]

**6. पाटेश्वर मंदिर.**

सातारा शहराच्या आग्नेयेस डोंगरावर पाटेश्वराचे ठिकाण आहे. या ठिकाणी एकुण आठ प्राचीन गुहा आहेत. पाटेश्वर मंदिर हे 16 व्या शतकाच्या उत्तरार्धात व 17 व्या शतकाच्या पूर्वाधात बांधलेले गेले आहे. हे मंदिर तटबंदीनी युक्त असुन या तटबंदीतील मुख्य द्वार उत्तराभिमुख आहे. मुख्य मंदिर पुर्वाभिमुख आहे. मुख्य दरवाजातून आत गेल्यावर डाव्या बाजूस पुष्करिणी लागते. तटबंदीच्या आत एक लहान मंदिर, नंदीमंडप व मुख्य प्रांगणात दोन मोठया आकाराच्या दिपमाळा आहेत. मुख्य मंदिराच्या सभामंडपास पुढील बाजुने वामनभिंत आणि कक्षासन आहे. मंडपाच्या मागच्या भिंतीत दोन देवकोष्ठे आहेत. मंडपात मागील भिंतीतील बाजूच्या छोटया मंदिरामध्ये शेषशायी विष्णू व गणेशाची मूर्ती आहे. तर बाजुच्या देवकोष्ठामध्ये भैरवी, सिद्धसाधु आणि भक्त आहे. मंडपाच्या जमिनीवरील मध्यभागी कूर्मशिला आहे. मुख्य गर्भगृहात जाण्यासाठी मराठा शैलीतील द्विशाखा प्रकारचे द्वार आहे. ललाटावर गणेश आहे. गर्भगृहात शिवलिंग आहे. गर्भगृहाच्या मागील भिंतीत देवकोष्ठे असून त्यात सरस्वतीची बैठी मुर्ती आहे. तिच्या चार हातात माला, पाश, वीणा आणि पुस्तक आहे.[10]

**7. मेरूलिंग**

सातारा जिल्हयात जावली तालुक्यात मेठयाजवळ मोरघर येथील डोंगरावर मेरूलिंग हे देवस्थान आहे. येथील मंदिराची रचना 70 फुट लांब व 27 फुट रूंद व 60 फुट उंच अशी आहे. मंदिराच्या आतील बाजूस तीन गाभारे व तीन शिखरे आहेत. या मंदिराच्या मागील बाजुस रूद्राक्षांच्या आकाराची स्वयंभू अशी पिंड आहे. पिंडीवरील छिद्रात पंचगंगेचा वास आहे. पिडींच्या मागील सिंहासनावर पोशाख घातलेल्या शिवपर्वतीच्या मूर्ती आहेत. पिंडीवर फणा काढलेली पंचमुखी पितळी मूर्ती आहे. बाहेरील गाभाऱ्यात गणपतीची मूर्ती आहे. या मूर्तीसमोर चौथऱ्यावर नंदी आहे. मंदिरापुढे 60 फुट उंचीची दीपमाळ उभारण्यात आलेली आहे. मेरूलिंग येथील यात्रा शुद्ध दशमीला भरते. चैत्र शुद्ध एकादशीला रात्री मेरूलिंग विवाह होतो. हा कार्यक्रम पारंपारिक पद्धतीने साजरा केला जातो.[11]

मेरूलिंग या ठिकाणाच्या नरकदेव शब्दाचा अंपभ्रश नरफदेव कैलासपती शंकराच्या वरदहस्ताने नरकासुर दैत्य अति माजला होता. भगवान श्री कृष्णानी त्याचा वध केला म्हणुन या ठिकाणास नरकदेव किंवा नरूदेव असे म्हणतात. याच गावात मेरूलिंग असे संबोधले जाते. पुराण काळापासुन याला मेरूपर्वत असे म्हणतात. हे मंदिर पांडवांनी बांधले आहे. हे मंदिराच्या रचनेवरून स्पष्ट करता येते. याशिवाय याठिकाणी पांडवांनी पाण्याचे झरे व तीर्थकुंड बांधली आहेत.

इ.स. 1702 मध्ये कोकणस्थ चिपळुण परशुरामक्षेत्री श्री ब्रम्हेंद्रस्वामी वास्तव्यास होते. स्वामींना हबशी राजाच्या मुलखातील रयतेने त्रास देण्यास सुरूवात केली. स्वामी हे सातारा प्रांतात जावळीतील घनदाट असा नरकदेव या ठिकाणी येऊन तपसाधना करू लागले. मेरूलिंगाचे शेजारी एका मोठया दगडात कोरलेली गुहा आहे. तेथे स्वामी लोकांना दर्शन देऊ लागले. सातारा संस्थानचे छत्रपती शाहु महाराज यांनी स्वामींचे शिष्यत्व पत्कारले. राजकीय सल्ला मसलतीसाठी छत्रपती शाहु महाराज मेरूलिंग येथे स्वामींकडे येत असत. वसईचा किल्ला जिंकण्यासाठी चिमाजी आप्पा हा श्री ब्रम्हेद्रस्वामींचा आशीवार्द घेण्यासाठी आपली स्वारी घेऊन मेरूलिंग महादेव मंदिरात आला होता. त्यांनी वसईचा किल्ला जिंकल्यावर नवस फेडण्यासाठी पुन्हा मेरूलिंगास येऊन 12 मण तीळ, तूप, तांदूळ,चार तोळे केशर आदि जिन्नस देऊन या मंदिरात होमहवन, अभिषेक करून मणभर शोभेच्या

दारूगोळयाने आतिषबाजी करून या ठिकाणी वसई किल्ल्यातील भली मोठी घंटा आणून गाभाऱ्यात बांधून घंटानाद केला होता.[12]

**संदर्भ**

1) देशपांडे महेश, साताऱ्याच्या परिसरात, लोकव्रत प्रकाशन, सातारा, 2011, पृ.13
2) सपकाळ सुभाष, निसर्गरम्य क्षेत्र यवतेश्वर, दैनिक ऐक्य सातारा, 10 ऑगस्ट 1992, पृ.4
3) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, मुंबई, 1999, पृ.907
4) केळकर य.न.रामशास्त्री प्रभुणे, भारतीय इतिहास आणि संस्कृती, एप्रिल 1996, पृ. 96
5) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर,1963, पृ.848
6) कित्ता, पृ.848
7) कित्ता, पृ.484,849
8) सासवडकर प्र.ल., श्री ब्रम्हेंद्रस्वामी धावडशीकर, 1985, पृ. 13 व 73
9) कित्ता, पृ.70
10) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर,1999, पृ.793
11) देशपांडे महेश, उपरोक्त, पृ.124
12) कित्ता, पृ.125